OFFICE OF THE
DEPUTY CONSERVATOR OF FORESTS,
CENTRAL CHANDA DN.CHANDRAPUR
MUL ROAD, INFRONT OF MATAMANDIR
CHANDRAPUR - 442401

उपवनसंरक्षक,
मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर
यांचे कार्यालय मुल रोड माता मंदीर समोर,
चंद्रपूर - 442401

Phone (07172) 253508, Fax 271376 E-mail: dycfcentralchanda@gmail.com

विषय :- 190.42 हे.वनक्षेत्र माणिकगड सिमेंट कंपनी गडचांदुर यांचे चुनादगड उत्खनना करीता वळते करणे बाबतचा प्रस्ताव.

जाक्र. कक्ष/सर्व्हे/ 1947
चंद्रपुर दिनांक 04/10/2016

प्रति,
कार्यकारी अध्यक्ष (माईनस),
माणिकगड सिमेंट कंपनी,
गडचांदुर ता.कोरपना जि. चंद्रपुर.

संदर्भ:- 1) आपले पत्र क्रमांक MN/DCF / 2016-720 दि.03.08.2016
2) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष/ सर्व्हे/1816 दि.23.09.2016
3) आपले पत्र क्रमांक MN/Forest /190.42/1259 दि.26.09.201
4) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष/ सर्व्हे/1879 दि.27.09.2016

आपल्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, प्रस्तावित लीज क्षेत्राची दि.07.07.2016 व दि. 09.09.2016 ला खालील स्वाक्षरीकर्ते यांनी मौका तपासणी केली असता लीज क्षेत्रात समाविष्ठ फेज-II व III मधील कंपनीने अधिग्रहीत केलेले 38.58 हेक्टर क्षेत्र महसुल विभागाकडुन पट्टावाटप झालेले असुन सदर क्षेत्र माणिकगड राखीव वनाचे अधिसुचीत वनक्षेत्र आहे. तसेच रिट पिटिशन क्रमांक 3669/09 मध्ये मुख्य सचीव महाराष्ट्र राज्य यांनी दि. 09.06.2015 च्या पत्रा अन्वये दिलेल्या सुचनांप्रमाने विवादीत क्षेत्र वनक्षेत्र समजण्यात यावे याबाबत कळविण्यात आले आहे. वरील प्रस्तावित 38.58 हे. पट्टावाटपाचे क्षेत्र विवादीत प्रकारातील आहे, व ते आता वनक्षेत्र झाले आहे. या बाबत आपणास वेळोवेळी सुचीत करण्यात आले आहे, परंतु आपले वरील संदर्भिय पत्रान्वये सदर क्षेत्राचा उल्लेख Revenue Land असा केला आहे. वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनक्षेत्र निर्वनिकरण होणार नाही तो पर्यंत अधिसुचीत राखीव वनक्षेत्राचा दर्जा राखीव वन असाच राहील . या बाबत आपणास कळविण्यात आले आहे, व त्या अनुषंगाने दि.30.09.2016 रोजी जिल्हाधिकारी,चंद्रपुर यांचे दालनात वरील 38.58 हे क्षेत्र वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनक्षेत्र वळतेकरणाचे प्रस्तावात समाविष्ठ करावे किंवा नाही याबाबत चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी,चंद्रपुर यांनी उपस्थित व्यवस्थापक मंडळ, माणिकगड सिमेंट कंपनी, गडचांदुर यांची व वनविभागातर्फे उपवनसंरक्षक, मध्य चांदा वन विभाग, चंद्रपुर यांची बाजु समजुन घेवुन वरील 38.58 हे क्षेत्र अधिसुचीत माणीकगड राखीव वनाचे वन क्षेत्र आहे. तसेच सदर क्षेत्र रिट पिटिशन क्रमांक 3669/09 मध्ये मुख्य सचीव महाराष्ट्र राज्य यांनी दि. 09.06.2015 च्या पत्रा अन्वये दिलेल्या सुचनांप्रमाणे विवादीत असल्याने सदर क्षेत्र वनक्षेत्र

झालेले आहे. माणिकगड सिमेंट कंपनी , गडचांदुर यांनी संपादीत केले पट्टयाचे क्षेत्र विवादीत क्षेत्रापैकी असल्याने ते क्षेत्र वनक्षेत्र झालेले आहे त्यामुळे सदर क्षेत्राचा दर्जा हा राखीव वन असल्याने,माणिकगड सिमेंट कंपनी , गडचांदुर 190.42+ 38.58 हे असे एकुन 229.00 हे. क्षेत्राचा वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्ताव सादर करावा, असे जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी सुचीत केले आहे.

वरील सुचनांप्रमाणे 229.00 हे. क्षेत्राचा वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येईल असे उपस्थित व्यवस्थापक मंडळ, माणिकगड सिमेंट कंपनी, गडचांदुर यांनी मान्य केले आहे.तेंव्हा सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात यावा ही विनंती.

सहपत्र:- १ प्रस्तावित प्रस्ताव व माईनिंग प्लॅन

उपवनसंरक्षक,
मध्य चांदा वन विभाग,
चंद्रपूर

प्रतिलीपी :- मुख्य वनसंरक्षक चंद्रपुर वनवृत्त चंद्रपुर यांना माहीतीस सविनय सादर.

प्रतिलीपी :- जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांना दि.30.09.2016 रोजी जिल्हाधिकारी,चंद्रपुर यांचे दालनात झालेल्या सभेच्या अनुषंगाने माहीतीस सादर.

उपवनसंरक्षक,
मध्य चांदा वन विभाग,
चंद्रपूर